‘मॉडेल व्हिलेज’च्या दिशेने मार्गस्थ

# नॅशनल वॉटर अ‍ॅवॉर्ड

## विजेता गाव

### महूद बुद्रुक, ता. सांगोला, जि. सोलापूर






## सन्मानपत्र आणि ट्रॉफी

नवी दिल्ली : भारत सरकारतर्फे २५ फेब्रुवारी २०१९ रोजी नॅशनल वॉटर अ‍ॅवॉर्ड (राष्ट्रीय जल पुरस्कार) ने महूद बुद्रुक ग्रामपंचायतीचा सन्मान करण्यात आला.

## विशेष आभार !

# सहकार्याप्रतीचा कृतज्ञता भाव

महाराष्ट्र शासन

शेतकऱ्यांच्या सेवार्थ
IN SERVICE OF THE FARMERS
कृषि विभाग, महाराष्ट्र राज्य

TATA TRUSTS

ज ने प न्यास
JNPT

THE ART OF LIVING

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" -कर्मवीर
रयत शिक्षण संस्था

# समाज-संत-शासन यांच्या सहभागातून ग्रामविकास




महूद बुदुक : आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांचा ग्रामस्थांशी संवाद आणि फळबाग लागवडीच्या कामाचा शुभारंभ



महूद बुद्रूक गावाला नॅशनल वॉटर अॅवॉर्ड मिळाल्यावर
आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रमुख श्री श्री रविशंकर
यांनी ट्विट द्वारे व्यक्त केलेला आनंदभाव



# नकाशा-पाणलोट क्षेत्राचा




कटफळ (ता. सांगोला) येथील उगम आणि शेळवे (ता. पंढरपूर) येथे भीमा तथा चंद्रभागा नदीमध्ये संगम होणारा कासाळ ओढा. पाणलोट क्षेत्राची माहिती



बेंगळुरु : आर्ट ऑफ लिव्हिंगच्या आश्रमामध्ये श्री श्री रविशंकर यांना कासाळ ओढा पुनरुज्जीवन प्रकल्पाची यशोगाथा सादर केली.



**महेंद्रकुमार बाबूराव महाजन**
**(संस्थापक, कासाळगंगा फाऊंडेशन)**

# दोन शब्द....

महेंद्रकुमार महाजन हे गारगोटी (जि. कोल्हापूर) येथील इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हील अँड रुरल इंजिनिअरींगचे विद्यार्थी. तत्पूर्वी त्यांचे शिक्षण मूळगाव महूद बुद्रुक (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत, रयत शिक्षण संस्थेच्या श्री शिवाजी विद्यालयात आणि नंतर पंढरपूरच्या विवेकवर्धिनी विद्यालय व सांगोलामधील सांगोला विद्यामंदिरमध्ये माध्यमिक शिक्षण झाले. तंत्रशिक्षणाचा विद्यार्थी असूनही उदरनिर्वाहासाठी ट्रॅक बदलला. पत्रकारितेची आवड वाढल्याने पाक्षिक, साप्ताहिक, दैनिक असे पत्रकारितेचे धडे गिरवत 'सकाळ माध्यम समूहा' मध्ये रुजू झाले. नोकरीनिमित्ताने कृषीपंढरी, कॅपिटल सिटी ऑफ वाईन, उद्यमनगरी, तीर्थक्षेत्र अशा नाशिकमध्ये राहत असले, तरीही मातृभूमीची आस कायम राहिली.

कुठलाही प्रश्न पुढे आल्यावर तो मुळापासून समजून घ्यायचा. नेमक्यापणाने आणि कालबद्ध आराखडा करुन उत्तर मिळवायचे. उत्तर मिळाले, की साजऱ्या होणाऱ्या जनभावनांच्या आनंदाकडे आदरभावाने पाहत, पुढच्या कामाला सुरवात करायची. ही अभियंत्यांची भूमिका त्यांनी अंगीकारली. त्यामुळे मातृभूमीतील कोणत्याही सामाजिक कामात 'मी'पणाची लागण होऊ द्यायची नाही याची काळजी घेतली. सुरवातीला रयत शिक्षण संस्थेच्या महूद बुद्रुक गावातील श्री शिवाजी विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या भौतीक गरजांच्या पूर्ततेला प्राधान्य दिले. संस्थेचे माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, गुरुजनांनी भरभरुन प्रतिसाद दिला. संस्थेचे आदरणीय चेअरमन (स्वर्गीय) अॅड. रावसाहेब शिंदे सरांनी त्यावर गावात येऊन कळस चढवला. इथून खऱ्या अर्थाने सामाजिक सामिलकीच्या आत्मविश्वासाची स्फुलिंग त्यांच्यात तेवत गेली.

वीस खेड्यांची बाजारपेठ आणि आता जवळपास १८ हजार लोकसंख्या झालेल्या महूद बुद्रूक गावाची पाण्याच्या अभावाने दैना झाली होती. बाजारपेठ ठप्प झाली होती. मे २०१६ मधील तो दिवस अजूनही आठवतो. ते नाशिककडे निघाले असताना गावाची जीवनदायिनी असलेल्या कासाळ ओढ्याच्या पुनरुज्जीवनाचा विषय त्यांना गप्प बसू देत नव्हता. ग्रामस्थांशी संवाद साधल्यावर प्रत्येकांकडून मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद पाहून कासाळ ओढा पुनरुज्जीवनाचे काम फत्ते होणार हा विश्वास त्यांना मिळाला. मग शासनाच्या विविध विभागांच्या अधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधायला सुरवात केली. अधिकारी-कर्मचारी सहकार्यासाठी पुढे आले. महूदचे सरपंच श्री बाळासाहेब ढाळे, उपसरपंच श्री दिलीप नागणे, सदस्य अॅड धनंजय मेटकरी, त्यावेळचे ग्रामविकास अधिकारी शंकर मेटकरी यांनी पुढाकार घेतला. अख्या गावाचा प्रतिसाद मिळाला. कृषी, महसूल, वन, सामाजिक वनीकरण, लघुपाटबंधारे, जलसंपदा अशा शासनाच्या विविध विभागाच्या स्थानिक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मोलाची साथ दिली.

कासाळ ओढ्याचे पुनरुज्जीवन होत असताना पुण्यातील सुनील जोशी यांच्याशी महाजन यांची भेट झाली. त्यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्यापर्यंत लोकसहभागाचा जलसंधारणातील महूद पॅटर्न पोचवला. डॉ. राजेंद्र सिंह यांच्याशी झालेल्या संवादातून 'ग्लोकल' पद्धतीने (लोकल प्रश्नांवर स्थानिक उपाययोजनांतून जागतिकस्तरावराचे आर्थिक उन्नतीचे उत्तर शोधणे) हे ग्रामविकासाचे सूत्र गवसले. दुष्काळासारख्या गंभीर विषयावर स्थानिक उपाययोजनांमधून मात करता येते हे लोकसहभागातून सिद्ध केल्याने डॉ. राजेंद्र सिंह यांनी महूदकरांचे कौतुक केले. जागतिक बाजारपेठेत मागणी असलेल्या डाळिंबाच्या उत्पन्नाची पंढरी पंचक्रोशीत शेतीच्या कामांना चालना ग्रामस्थ-अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहभागातून मिळाली. कृषी विभागाने मोठे योगदान दिले. डॉ. राजेंद्र सिंह यांनी स्वतः कासाळगंगा ओढ्याच्या उगमापासून ते संगमापर्यंत पुनरुज्जीवन कामाची सूचना करत टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस, टाटा ट्रस्ट यांचे

सहकार्य मिळण्यात मार्गदर्शन केले. सांगोला, पंढरपूर, माळशिरस या तीन तालुक्यातील २३ गावांमधील ४२ किलोमीटर ओढ्याच्या पुनरुज्जीवनाचे काम अंतीम होत आहे. त्याबद्दल ३ तालुक्यातील २३ गावांमधील ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, शेतकरी यांचे आभार मानायला हवेत. भगीरथ प्रकल्पात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, लोकसहभाग रुपाने सहकार्य केलेल्यांना कृतज्ञतेचा नमस्कार करण्यात येत आहे. टाटा ट्रस्ट, टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस, आर्ट ऑफ लिव्हिंग, रयत शिक्षण संस्था, महाराष्ट्र शासन, कृषी विभागासह मदतकार्य केलेले शासनाचे इतर विभाग यांच्याप्रती ऋतज्ञता व्यक्त करत आहोत.


लोकसहभाग आणि जलक्रांतीचा घटनाक्रम नेमक्यापणाने उपलब्ध व्हावा म्हणून माहिती पुस्तिका आपल्या हातात देताना आनंद होत आहे. लोकसहभाग, ग्रामविकास, पाणी कमवण्याची चळवळ वृद्धींगत व्हावी म्हणून त्या श्रृंखलेत एक कडी जोडण्याचा हा प्रयत्न आहे. आपणा प्रत्येकाला ग्रामस्थांची ही चळवळ नक्की आवडेल असा आशावाद आहे.

सोलापूरचे तत्कालिन जिल्हाधिकारी रणजित कुमार, डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज बिराजदार, कृषी उपसंचालक रवींद्र माने, पुण्याचे कृषी सहसंचालक दिलीप झेंडे, कृषीचे तत्कालिन संचालक प्रल्हाद पोकळे, जलसंधारण संचालक कैलास मोते, पंढरपूरचे तत्कालिन कृषी उपविभागीय अधिकारी शिवराज ताटे, आताचे रवींद्र कांबळे आणि त्यांचे पंढरपूर, सांगोला, माळशिरस तालुक्यातील सर्व सहकारी यांचे विशेष आभार.!

'मॉडेल व्हिलेज' च्या दिशेने मार्गक्रमण सुरु असलेल्या महूदकरांचा प्रवास इथंच थांबलेला नाही. महाजन यांचा संवाद, समन्वय, पाठपुरावा, तांत्रिक बाबींची पूर्तता अशा बाबी त्यास कारणीभूत आहेत. गावाचा प्रवास बाजारपेठ शोधण्याच्या अनुषंगाने 'फार्मर्स प्रोड्युसर कंपनी' स्थापन करण्याच्या दिशेने पुढे निघालेला आहे. त्यास आपली साथ, मदत व्हावी हीच अपेक्षा !

**– डॉ. विलास खांडेकर**

(महूद बुद्रुक, ता. सांगोला, जि. सोलापूर)



**प्रकाशक** – समस्त ग्रामस्थ, महूद बुद्रूक, ता. सांगोला, जि. सोलापूर

**प्रसिध्दी** :– २६ जानेवारी २०२०

**मुखपृष्ठ व अंतर्गत सजावट** – श्री. भूषण क्षीरसागर (बी क्रिएटर्स, नाशिक)

# जलक्रांतीची लोकचळवळ !

**अख्खं गाव जलनायक बनलयं. दुष्काळमधून मुक्ती मिळवण्यासाठी महूद बुद्रूक (ता. सांगोला, जि. सोलापूर) ग्रामस्थांनी जलयुक्त शिवार अभियानातून कासाळ ओढ्याचे पुनर्जीवन केले. त्यातून शेतीच्या आणि बाजारपेठीय अर्थकारणाला चालना मिळाली. गावाची मॉडेल व्हिलेजच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. जलसंधारणामध्ये गावाने नॅशनल वॉटर ॲवॉर्ड मिळवले. लोकसहभागाच्या चळवळीचा सांगोला, पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील २३ गावांमध्ये झालेला विस्तार, सामाजिक एकोपा असे क्षितीज विस्तारले. सोलापूरच्या प्रिसिजन फाऊंडेशनतर्फे स्वर्गीय सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्काराने गौरवण्यात आले. अशा या महूद बुद्रूक (ता. सांगोला, जि. सोलापूर) गावच्या कर्तबगार ग्रामस्थ, शेतकऱ्यांच्या प्रयत्नांच्या पराकाष्टाची ही यशोगाथा...**

दुष्काळाच्या झळांमधून मुक्त होण्यासाठी काय करायचे? या प्रश्नाने २० खेड्यांची बाजारपेठ महूद बुद्रूक (ता. सांगोला, जि. सोलापूर) या गावचे शेतकरी, ग्रामस्थ चिंतीत होते. २५ वर्षांपूर्वी खळखळ वाहणारा कासाळ ओढा नाला झाल्याने गावच्या अर्थकारणाला मोठा धक्का बसला होता. अखेर सरपंच बाळासाहेब ढाळे, उपसरपंच दिलीप नागणे, तत्कालिन ग्रामविकास अधिकारी शंकर मेटकरी, ॲड धनंजय मेटकरी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांच्या जोडीला अंकुश चव्हाण, दत्ता आसबे, दादासाहेब कांबळे, सुभाष ढाळे, धिरज जाधव, कैलास खबाले, संतोष खडतरे, जयवंत नागणे, गोविंद नागणे, बाळासाहेब बाजारे,आदींनी पुढचे पाऊल टाकल जलयुक्त शिवार अभियानातून शिवार हिरवाकंच करण्याच्या कृतीशील कामाला सुरवात केली. त्यासाठी झालेल्या बैठकींसाठी गावातील तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने कामाला वेग येण्यास मदत झाली.

पाणी कमविण्यासाठी आणि शेती उर्जितावस्थेत आणण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक गावांमधून प्रयत्नांची पराकाष्टा सुरु आहे. त्यामध्ये महूद गाव अग्रेसर राहिले. पंढरपूरपासून कराड रस्त्यावर पंचवीस किलोमीटर अंतरावरील हे गाव कासाळ ओढ्याच्या काठावर वसलयं. राजकारणाचा गावगाडा इथंही हाकला जातोय. पण एकदा निवडणूक संपली, की राजकीय मतभेदांना इथं थारा दिला जात नाही. शिक्षणातून सेवा, नोकरी, व्यापार, उद्योगात करिअर केले जात असले, तरीही बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेतीवर आहे.

## लोकसहभागाचा प्रतिसाद

जलयुक्त शिवार अभियानातून जीवनदायिनी कासाळ ओढ्याचे पुनर्जीवन करण्याच्या कामाचा श्रीगणेशा झाला. सुरवातीला तरुणांनी स्वतःच्या पैशातून जेसीबी यंत्र ओढ्यात उतरवत गाळ काढण्याच्या कामाची सुरवात केली. सोलापूरचे तत्कालिन जिल्हाधिकारी रणजित कुमार, सांगोल्याचे तत्कालिन तहसिलदार श्रीकांत पाटील यांनी एक जेसीबी यंत्र उपलब्ध करुन दिले. कृषी विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एक दिवसाच्या वेतनातून एक जेसीबी यंत्र दिले. अशा पद्धतीने सहा जेसीबींची धडधड ओढ्यात सुरु झाली. कामाला सुरवात झाल्याच्या तिसऱ्या दिवशी रयत शिक्षण संस्थेचे विभागीय अध्यक्ष संजीव पाटील यांनी डॉ. विलास खांडेकर, रंभाजी पाटील यांच्यासह कामाची पाहणी केली रयत शिक्षण संस्थेने अडीच लाखांची मदत पोच केली. मग मात्र उत्साह दुणावलेल्या तरुणांनी मागे वळून पाहिले नाही. श्री रणजित कुमार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बसवराज बिराजदार, कृषी उपसंचालक रवींद्र माने, पंढरपूरचे तत्कालिन उपविभागीय कृषी अधिकारी शिवराज ताटे यांनी जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या निधीपैकी वीस लाखांचा निधी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून गावाला मंजूर केला. तोपर्यंत गावातून दहा लाखांची लोकवर्गणी जमा केली. गावचे प्राथमिक-माध्यमिक शिक्षक, औषध-कृषी निविष्ठा विक्रेते, सोने-चांदीचे दुकानदार, भूमीपूत्र आणि इतर गावांमध्ये नोकरी असलेले, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी अशा साऱ्यांच्या मदतीचा त्यात समावेश होता. या निधीतून चार पोकलॅनद्वारे गाळ उपसण्यास सुरवात झाली. हा गाळ शेतकऱ्यांनी नेऊन शेती सुपीक केली. शेतासाठी लायक नसलेला गाळ ओढ्याच्या दोन्ही काठावर बांधासारखा संरक्षित करत

# पहिला दिवस !



महूद बुद्रूक : कासाळ ओढ्याचे पूर्वीचे रुप



महूद बुद्रूक : मे २०१६ मधील पहिला दिवस. सुटीच्या दिवशी तत्कालिन सांगोला तहसिलदार श्रीकांत पाटील यांनी कासाळ ओढ्याच्या पुनरुज्जीवन कामाच्या तयारीच्या संबंधाने केलेली पहिली पाहणी.

ओढ्याची हद्दनिश्चिती केली. दरम्यानच्या काळात सरकारी यंत्रणेकडून ५ किलोमीटर ओढा पुनरुज्जीवनासाठी ८८ लाखांपर्यंत अपेक्षित खर्चाचा अंदाज वर्तवला. भल्या मोठ्या रकमेचा अंदाज ऐकल्यावर कामाचा वेग मंदावून पावले थबकणे स्वाभाविक होते. प्रत्यक्षात तसे घडले नाही. ३५ लाख रुपयांमध्ये दीड महिन्यात ५ किलोमीटर ओढ्याच्या पुनर्जीवनाचे काम पूर्ण झाले. पुण्याचे सुनील जोशी, राजेंद्र वाघमारे, कृषी विभागाचे शशिकांत महामुनी, संतोष चौधरी यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. मोठ्या लोकसंख्येच्या गावात लोकचळवळ उभी राहू शकत नाही या समजाला महूदकरांनी दिलेले हे कृतीशील उत्तर होय.

### अतिक्रमित तुकड्यापेक्षा पाणी महत्वाचे !

प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेतून गावाला पाणी मिळत असले, तरीही पाणी पुरत नव्हते. गावच्या पाण्याचे संकट सहा महिन्यांनी पुढे ढकले गेले. एक हजार हेक्टरसाठी शाश्वत पाण्याची उपलब्धता झाली. ओढ्याचे पुनर्जीवनाचे काम सुरु असताना अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांचे काय करायचे? असा घोर यंत्रणांपुढे होता. पण गावात घडले नेमके उलटे. अतिक्रमित तुकड्यापेक्षा पाणी महत्वाचे मानून शेतकऱ्यांनी स्वतःहून अतिक्रमण निर्मूलनाला मदत केली. पाणी साठवण्यासाठी भले मोठं नैसर्गिक भांड तयार झाले पण वरुणराजा हजेरी लावत नाही म्हटल्यावर पवित्र रमजान महिन्यात मुस्लीम बांधवांनी ओढ्यात नमाज पठण करत वरुणराजाची आराधना केली. सांगोल्याचे तत्कालिन ज्येष्ठ आमदार डॉ. गणपतराव देशमुख, सांगोल्याचे आताचे आमदार अॅड. शहाजीबापू पाटील, तत्कालिन खासदार विजयसिंह मोहिते–पाटील, जिल्हा परिषदेच्या तत्कालिन अध्यक्षा जयमाला गायकवाड, आमदार दत्तात्रेय सावंत, माजी आमदार दीपक साळुंखे,

### मॉडेल व्हिलेज साकारायचयं !

**महूदकरांना मॉडेल व्हिलेज साकारायचयं. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात लोकसहभागाची चळवळ उभी राहू शकत नाही हा पारंपारिक गैरसमज महूदकरांनी खोडून काढला आहे. गावच्या पिण्याच्या पाण्याचं संकट टाळले. भूजल पातळीत वाढ झाल्याने डाळिंबाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत चालले. शाश्वत पाण्यामुळे पीक पद्धतीत बदल झाला. विहीर, बोअर पुनर्भरणापासून ते छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यापर्यंतच्या विविध प्रयत्नांना चालना मिळाली. ओढ्याच्या दोन्ही काठांवर वृक्षारोपण करत टुरिझम स्पॉटची निर्मिती करण्याच्या प्रयत्न सुरु आहे. फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून शीतसाखळी उभी करत डाळिंब थेट दिल्लीच्या बाजारपेठेत नेण्याबरोबर प्रक्रिया उद्योग उभारणी करण्याचा शेतकऱ्यांचा मानस आहे.**

### ओढा पुनरुज्जीवनाच्या व्यतिरिक्तचा महूदकरांचा लोकसहभाग

- ओढ्यातील ७५ टक्के गाळ शेतकऱ्यांनी स्वतः वाहून नेण्यातून मिळाला ४५ लाखांचा लोकसहभाग
- २१ वनराई बंधाऱ्यांची उभारणी : प्रत्येकी १० हजार रुपये याप्रमाणे २ लाख १० हजाराचा लोकसहभाग
- २८ कच्चे बंधारे उभारले : प्रत्येकी ५ हजार रुपये याप्रमाणे १ लाख ४० हजाराचा लोकसहभाग
- १५६ विहिरींचे पुनर्भरण : प्रत्येकी ५ हजार रुपये याप्रमाणे ५ लाख ८० हजारांचा लोकसहभाग
- ११० बोअरचे पुनर्भरण : प्रत्येकी अडीच हजार रुपये याप्रमाणे २ लाख ७५ हजारांचा लोकसहभाग
- ११० ठिकाणी छतावरील पाणी अडवून भूजल भरण : अडीच लाखांचा लोकसहभाग
- २५ हजार वृक्षांचे लोकसहभागातून रोपण

# ग्रामस्थांच्या बैठकी





महूद बुद्रूक : कासाळ ओढ्याच्या पुनरुज्जीवन कामांसाठी झालेल्या बैठकींसाठी ग्रामस्थांची उपस्थिती

तत्कालिन उपजिल्हाधिकारी दिनेश भालेराव आदींनी ग्रामस्थांचे कौतुक केले. हे तर नदीचे पुनर्जीवन... अशी प्रतिक्रिया नोंदवली. आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्या हस्ते कामाचे लोकार्पण करण्यात आले. त्यांच्या हस्ते फलोत्पादन कामांचा श्रीगणेशा झाला. लोकसहभागाच्या महूद पॅटर्नची प्रेरणा घेत, कटफळ (ता. सांगोला) आणि कोळेगाव (ता. माळशिरस) या गावच्या ग्रामस्थांनी कासाळ ओढ्याच्या पुनर्जीवनाचे काम लोकसहभागातून सुरु केले होते.

## चळवळीला टाटा ट्रस्टचा बुस्ट

कासाळ ओढ्याचे माथा ते पायथा असे पुनरुज्जीवन करण्यासह वृक्षारोपणाचा सल्ला डॉ. राजेंद्र सिंह यांनी दिला होता. या कामासाठी त्यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. महाराष्ट्र शासनाकडून टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडे प्रस्ताव पाठवला गेला आणि टाटा ट्रस्ट ने सहा कोटी मंजूर करत चळवळीला बुस्ट दिला. सांगोला, माळशिरस, पंढरपूर या तीन तालुक्यातील या कासाळ ओढ्याचे ४२ किलोमीटर पुनरुज्जीवनाचे काम अंतीम होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण विभागाने सिमेंट बंधाऱ्यांच्या साखळीसाठी निधी उपलब्ध करुन दिला. पंढरपूरचे उपविभागीय कृषी अधिकारी रवींद्र कांबळे हे निरनिराळ्या योजना या भागामध्ये पोचवण्यासाठी विशेष सहभाग देतात. गावाने जलयुक्त शिवार अभियानातील स्पर्धेतील राज्यस्तरापर्यंत महूद गाव पोचले आहे. तत्कालिन कृषी संचालक प्रल्हाद पोकळे, पुण्याचे कृषी सहसंचालक दिलीप झेंडे यांनी कृषी प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठीय प्रयत्नांविषयी इथल्या शेतकऱ्यांशी संवाद साधलाय. सोलापूरचे तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनीही ग्रामस्थांना प्रोत्साहित केले. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नॅशनल वॉटर अॅवॉर्ड हा सन्मान ग्रामस्थांनी दिल्लीत स्विकारला. जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या निधीतून हे मोठे काम उभारल्याबद्दल श्री. गडकरी यांनी ग्रामस्थांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली. तसेच सोलापूरमध्ये प्रिसिजन फाऊंडेशनतर्फे झालेल्या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे यांच्या हस्ते स्वर्गीय सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार गावाने स्विकारला. आता एवढ्यावरच थांबायचे काय? असा प्रश्न स्वाभाविकपणे तयार होतो. महूदकरांचे त्यावरही नाही असे उत्तर असून शाश्वत पाण्याच्या उपलब्धतेतून पीक पद्धतीत बदल करण्यास सुरवात केली आहे. विहीर, बोअर पुनर्भरण करत छतावरील पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यास सुरवात झाली. ओढ्याच्या दोन्ही काठावर वृक्षारोपण आणि पर्यटन स्थळांचा विकास व त्याचजोडीला शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून डाळिंबासाठी शाश्वत बाजारपेठेची उपलब्धता, प्रक्रिया उद्योग यासाठी महूदकरांनी प्रयत्न सुरु केले आहेत. टाटा ट्रस्टच्या अधिकाऱ्यांची त्यासंबंधाने एक बैठक गावात झाली आहे.

✲ समाप्त ✲

### प्रकल्पांतर्गत सर्वकंष स्थिती
### सांगोला–माळशिरस–पंढरपूर तालुका

- २३ गावांची लोकसंख्या : ७६ हजार २९६
- २३ गावांचे भौगोलिक क्षेत्र : ३६ हजार २७४ हेक्टर
- २३ गावातील वनक्षेत्र : १ हजार ३५३ हेक्टर
- २३ गावातील कोरडवाहू क्षेत्र : ११ हजार ७७ हेक्टर
- ४२ किलोमीटर पुनरुज्जीवनातील गाळ : २८ लाख ३८ हजार ६७९ घनमीटर
- गाळामुळे २३ गावांच्या शिवारात नव्याने लागवडीखाली येणारे क्षेत्र : ४७३ हेक्टर
- एकुण ४२ किलोमीटर कासाळ ओढा पुनरुज्जीवन प्रकल्पाचा खर्च : ९ कोटी आणि लोकसहभाग : ३ कोटी रुपये

### लोकसहभागाची क्षेत्रीय स्थिती

- महूदचे भौगोलिक क्षेत्र : ४ हजार ५४७ हेक्टर
- महूद शिवारातील वहितीखालील क्षेत्र : ३ हजार ४५२ हेक्टर आणि बागायत क्षेत्र : १ हजार ६०४ हेक्टर)
- वार्षिक पर्जन्यमान : ५३८.५० मिलीमीटर
- गाळामुळे वहितीखालील क्षेत्रात महूदमध्ये ५२ हेक्टरनी वाढ
- महूद शिवारातील फळबागांच्या पूर्वीच्या ६७० हेक्टरमध्ये १४० हेक्टरने वाढ
- महूद शिवारातील भाजीपाल्याचे ३० हेक्टर क्षेत्रामध्ये आणखी ४० हेक्टरची भर पडली
- पाण्याच्या उपलब्धतेमुळे डाळिंबाच्या उत्पन्नात २० टक्क्यांनी वाढ होत थेट वर्षाला अडीच कोटींचा फायदा होऊ लागलाय
- महूदमधील ओढा पुनरुज्जीवनाच्या कामामुळे महाराष्ट्र शासनाने गाळ उपसण्याचा घनमीटरचा दर निम्म्याहून अधिक कमी केला.

# कासाळ ओढा पुनरुज्जीवन कामाची सुरवात







# कासाळ ओढा पुनरुज्जीवनाचे सुरु असलेले काम











# कासाळ ओढा पुनरुज्जीवनाचे पूर्ण झालेले काम







कासाळ ओढ्याच्या पुनरुज्जीवनानंतर वरुणराजाने वर्षाव केला. त्यामुळे दुथडी भरुन वाहणारा कासाळ ओढा आणि पाण्यामुळे फुललेला शिवार



# कासाळ ओढा पुनरुज्जीवन कामाचा लोकार्पण सोहळा







**कटफळ (ता. सांगोला) ते शेळवे (ता. पंढरपूर)
या २३ गावांमधील ४२ किलोमीटर लांब कासाळ ओढ्याच्या पुनरुज्जीवन कामातील
लोकसहभागाला साथ मिळावी म्हणून दिल्लीमधील बैठकी**









# माध्यमांनी दिलेली प्रसिद्धी

https://www.villagesquare.in/2020/01/06/water-stress-evaporates-once-a-river-flows

VillageSquare

Home Featurere

RIVER REVIVAL

## Water stress evaporates once a river flows

Hiren Kumar Bose • Jan 06, 2020 • Solapur, Maharashtra

maiden cycle of drought that continued in the subsequent years too.

"In several places, the width of the rivulet was as narrow as 10 meters," J Mahamuni of the district water department, told VillageSquare.in. "However following an appeal from the district collector, the encroachers vacated voluntarily. And now the odha has been widened to 100 meters."

**Ripple effect**

With earthmovers put to work, the excavation and desilting of the 5 km long stretch were completed within two-and-a-half months. Farmers who had barren lands used the large volume of excavated soil in their farms. When the monsoons arrived, the deepened rivulet flowed to its full, raising groundwater table.



Villagers celebrated when the desilted Kasal rivulet filled up after the monsoon rains (Photo courtesy Mahud Gram Panchayat)

Soon residents of villages downstream too joined in, leading to the desilting of an additional 43 km long stretch. This would benefit 23 additional villages in Pandharpur and Malshiraj taluks with a total population of 77,000 people.

The rejuvenation of 48 km long rivulet cost Rs 9 crore, of which Rs 6 crore came from the Tata Trusts and Rs 60 lakhs from the CSR funds of Jawahar Lal Nehru Port Trust, routed through the Art Of Living Foundation. Individuals, NGOs and charitable organizations contributed the rest.

**Agriculture revival**

Everyone in Mahud, be it a doctor, lawyer, jeweler, shopkeeper or a school teacher,



# नॅशनल वॉटर अॅवॉर्ड नवी दिल्लीतील सोहळा



नवी दिल्ली: भारत सरकारतर्फे महूद बुद्रुक (ता. सांगोला, जि. सोलापूर) ग्रामपंचायतीची नॅशनल वॉटर अॅवॉर्डसाठी देशातून पहिल्या क्रमांकाने निवड झाली. २५ फेब्रुवारी २०१९ रोजी माननीय केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारताना सरपंच बाळासाहेब ढाळे, उपसरपंच दिलीप नागणे, सदस्य अॅड. धनंजय मेटकरी, ग्रामविकास अधिकारी शंकर मेटकरी, कैलास खबाले, महेंद्रकुमार महाजन, उमेशकुमार महाजन आदी.

# माध्यमांनी दिलेली प्रसिद्धी

https://thewire.in/environment/water-stress-evaporates-once-a-river-flows

THE WIRE

SUBSCRIBE | BECOME A SUPPORTER

POLITICS | ECONOMY | EXTERNAL AFFAIRS | SECURITY | LAW | SCIENCE | SOCIETY | CULTURE | OPINION | VIDEOS | HINDI | MARATHI | URDU

ENVIRONMENT

## Let a River Flow, and the Water Stress Will Go Away

Solapur, which has one of the largest areas covered under the Drought Prone Area Program (DPAP) in Maharashtra, has average precipitation of roughly 488mm.



The 15,200-odd inhabitants of Mahud-Budruk village — wracked by recurrent droughts, increasing dependence on tankers for drinking water in summer, shrinking farming acreage due to paucity of irrigation facilities and falling livelihood income — had for long nursed a dream of reviving the 5km long Kasal odha or rivulet.

Kasal rivulet made its presence felt when it rained, which is a rare event, said the villagers. According to the villagers, it rained heavily this year and not a drop was wasted since they had deepened and desilted the rivulet ahead of the monsoon.

The initial steps to address the water stress began in May 2016. The efforts culminated two years later, with Mahud judged as the Best Village Panchayat of 2018 and conferred with the National Water Award that included a citation and Rs 2 lakh cash component.

The villagers' initiative that ushered in active participation of the local people, district officials and a few corporate entities who donated generously for the water conservation project, is being hailed as the Mahud pattern. Revival of Kasal has led to increased groundwater levels and cultivation using drip irrigation.

**Drought-prone district**

Located on the Pandharpur–Karad Road, Mahud in Sangola taluk of Solapur district, is in the rain shadow area of Maharashtra. Hence, Mahud and all the villages in the district are prone to perpetual water scarcity.

The average precipitation in Solapur district is roughly 488mm, the monsoon period being June to September. It has one of the largest areas covered under Drought Prone Area Program (DPAP) in Maharashtra, with 11 administrative blocks covering about 15,730 sq. km area.



Villagers excavated and desilted the bed of Kasal rivulet with the help of earthmovers provided by the district administration (Photo courtesy Mahud Gram Panchayat)

As per the National Agricultural Research Project (NARP) classification of agro-climatic zones of the country, Solapur falls under the MH-6 scarcity zone. Though Mahud has a cultivable land measuring 2,836 hectares, 500 hectares remained uncultivated due to lack of irrigation facilities.

**Villagers' contribution**

Awareness through processions, singing of bhajans and kirtans, campaigns in schools and workshops for women's self-help groups on issues relating to water conservation and tree plantation became a daily affair in Mahud.

"We began by involving the local people in raising awareness and the requisite funds to revive the rivulet," Mahendra Mahajan, a correspondent of Sakal, a Marathi daily, and a native of the village, now settled in Nashik, told VillageSquare.in.

To address the issue of water stress, Mahajan mobilised the villagers and brought government officials on board for the rejuvenation. "Every villager be she a gram panchayat member, student, homemaker, farmer, shop keeper, and even those who came for Datta Jayanti Mela, donated generously," he said.


With individuals donating between Rs 1,000 and Rs 10,000, the Mahud gram panchayat raised Rs 15 lakhs within a week. "Even the district irrigation department officials donated two days' salary towards hiring of earthmovers and diggers."

# कासाळगंगा फाऊंडेशनचा सोलापूरमधील गौरव




सोलापूर : प्रिसिजन फाऊंडेशनतर्फे शिवछत्रपती रंगभवन सभागृहात झालेल्या सोहळ्यात स्वर्गीय सुभाष रावजी शहा स्मृती पुरस्कार आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे आणि अभिनेते गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते स्विकारताना महूदचे सरपंच बाळासाहेब ढाळे, उपसरपंच दिलीप नागणे. शेजारी प्रिसिजन फाऊंडेशनच्या डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजनचे चेअरमन यतीन शहा, झाराप (जि. सिंधुदुर्ग) येथील पुरस्कार विजेत्या भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे डॉ. प्रसाद देवधर, डॉ. हर्षदा देवधर, महेंद्रकुमार महाजन आदी.

# माध्यमांनी दिलेली प्रसिद्धी













# माध्यमांनी दिलेली प्रसिद्धी





सकाळ साप्ताहिक

## महूद जलक्रांतीची लोकचळवळ





महूद बुद्रुक :– कासाळ ओढा पुनरुज्जीवन लोकार्पण सोहळ्यात आंतरराष्ट्रीय जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना महेंद्रकुमार महाजन




नाशिक : संगणकीय शिक्षणातील सिलीकॉन व्हॅली संस्थेचे प्रमुख प्रमोद गायकवाड यांनी कासाळ ओढा पुनरुज्जीवन कामाच्या लोकार्पण सोहळ्याला उपस्थित राहिल्यानंतर सोशल मीडियातून मांडलेली प्रतिक्रिया.

## संपर्क


**महेंद्रकुमार बाबूराव महाजन**

(संस्थापक, कासाळगंगा फाउंडेशन)

मु. पो. महूद बुदूक, ता. सांगोला, जि. सोलापूर

9881099295

@Mahendra B Mahajan

@Mahendra_Sakal

@Mahendra B Mahajan

mprassana@gmail.com



Design by : Creators We Create Our Concept 9552502700